
# संदेष्ट्यांनी देवाच्या संदेशाची घोषणा केली

मुलांना शिकविणाऱ्यांनी P9b अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू येशू मसीहाच्या येण्याची घोषणा करणाऱ्या संदेष्ट्यांकडून तुझ्याबद्दल आणि आमच्यासाठीच्या तुझ्या योजनांविषयी जाणून घेण्यास मला व माझ्या मंडळीला साहाय्य कर.''

## 1. जुन्या करारातील संदेष्ट्यांचे लेख शिकविण्याची तयारी करा

**संदेष्ट्यांच्या लेखनाचा काळ**




वर दिलेल्या आलेखातील छायांकित भाग संदेष्ट्यांनी लिखाण कोणत्या काळात केले ते दर्शवितो खिस्तपूर्ण सुमारे 835 ते 400

पाहा यशया 6:1-8 मध्ये:

- देवाचा दृष्टांत पाहतांना संदेष्ट्यांनी दिलेला प्रतिसाद (वचने 1-5)
- देवाने पुन्हा खात्री कशी पटविली (वचने 7 व 6) आणि
- यशयाने काय करण्याची तयारी दाखविली (वचन 8)

**व्याख्या**

**संदेष्टा.** जुन्या कराराच्या काळात देव बरेचदा आपल्या इस्राएल लोकांकडे पवित्र आत्म्याने प्रेरित केलेल्या 'पवित्र मनुष्यांच्या' द्वारे संदेश पाठवीत असे 2 पेत्र 1:21.

**भविष्यवाणी** देवाच्या संदेष्ट्यांनी त्याच्या लोकांना पातकापासून मागे वळून त्याचे आज्ञापालन करण्यास सांगितले; लोकांना दु:ख का सहन करावे लागते हे स्पष्ट केले, विश्वासणाऱ्यांना आशा आणि दिलासा दिला, न्यायनिवाड्याचे आणि अभिवचनाने देऊ केलेला राजा परिपूर्ण न्यायाने राज्य करील असे भविष्य वर्तविले या राजालाच त्यांनी मसीहा म्हटले आहे.

**भाकित करणे** कधी कधी देवाच्या संदेष्ट्यांनी अद्याप न घडलेल्या गोष्टींविषयी सांगितले. त्यांनी चार प्रकारची भाकिते केली (1) काही गोष्टी त्यांच्या स्वत:च्या ल्यातीतच घडून आल्या; (2) काही त्यांच्या मृत्यूनंतर लागलीच घडून आल्या; (3) इतर गोष्टी पुढे शेकडो वर्षांनी घडून आल्या; (4) काही संदेष्टे सर्व खरे संदेष्टे इब्री म्हणजेच यहूदी होते आणि ते फक्त प्रभूच्या वतीनेच बोलले, अन्य दैवतांच्या बाजूने ते कधीच बोलले नाहीत. यशया 42:8-9

**खऱ्या संदेष्ट्यांनी** होणाऱ्या गोष्टींविषयी भाकीत केले तेव्हा त्या गोष्टी घडल्या. काही संदेष्टे उत्तरेकडील राज्याशी, इस्राएलाशी बोलले, इतर यहूदा नावाच्या दक्षिणेकडील-राज्याशी बोलले तर योनासारख्या काही संदेष्ट्यांनी इतर राष्ट्रांना संदेश दिला. अनुवाद 18:17-21.

खोटे संदेष्टे खोटे संदेष्टे प्रभू ऐवजी अन्य दैवतांच्या वतीने बोलले आणि लोकांना इतर देवांची उपासना करण्यास लावून त्यांनी प्रभूचे नियमशास्त्र मोडण्याचा प्रयत्न केला. अनुवाद 13:1-4

**जुन्या करारातील संदेष्ट्यांच्या लेखांचा थोडक्यात सारांश**

योशे व्यतिरिक्त जुन्या करारातील आणखी इतर 17 संदेष्ट्यांनी पुस्तके लिहिली ही पुस्तके ही पवित्र शास्त्राचा एक भाग आहेत. त्यांनी मसीहा येशू येण्यापूर्णी किती वर्षे अगोदर संदेश दिले हे पुढे दिलेल्या तारखांवरून समजण्याम मदत होते.

ख्रिस्तपूर्व 835 वर्षे योएल ने यहूदा वर टोळधाडीचा हल्ला होईल असे भाकीत करून लोकांना पश्चात्ताप करण्याचे कळकळीचे आवाहन करतो. पाहा प्रे. कृ. 2:16-21 मध्ये पेत्र योएल 2:28-32 ही वचने कशा प्रकारे उधृत करतो.

783-753 वर्षे योनाने मूर्तिपूजक निनवे राष्ट्राला पश्चात्ताप करण्याचे कळकळीचे आवाहन केले. पाहा मत्तय 12:40-41 मध्ये येशूने योना 1:17 ह्या वचनाचा कसा आधार घेतला आहे.

760-750 वर्षे **आमोसने** इस्राएलाचा विनाश आणि भविष्यातील आशा यांची घोषणा केली. पाहा प्रे. कृ. 15:13-19 मध्ये याकोबाने अमोस 9:11 व 12 ही वचने कशी उधृत केली आहेत.

755-710 वर्षे **होशेय** इस्राएलाच्या अप्रामाणिकपणाचे आणि भविष्यातील सुटकेची उदाहरणे दिली आहेत. पाहा रोम 9:22-26 मध्ये पौलाने होशेय 2:23 ह्या वचनाचा कसा उल्लेख केला आहे.

740-680 वर्षे **यशयाने** यहूदाला तारणासाठी परमेश्वरावर भरवसा ठेवण्याचे आणि मसीहाची वाट पाहण्याचे आवाहन केले पाहा प्रे. कृ. 9:30-35 मध्ये फिलिप्पाने हबशी षंढाला यशया 53:7 व 8 ही वचने कशी स्पष्ट करून सांगितली.

739-386 वर्षे **मीखा** ने येणाऱ्या न्यायनिवाड्याविषयी यहूदा व इस्राएलाला इशारा देऊन आशा दिली. पाहा मत्तय 10:35-39 मध्ये येशूने मीखा 7:6 हे वचन कसे उधृत केले आहे.

664-612 वर्षे **नहूमने** यहूदा आणि निनवेसाठी न्यायनिवाडा आणि सुवार्तेची घोषणा केली. पाहा रोम 10:15 मध्ये पौलाने नहूम 1:15 हे वचन वापरले आहे.

640-628 वर्षे **सफन्याने** यहूदासाठी दैवी न्यायाच्या महान दिवसाची घोषणा करून लोकांना खरे बोलण्याचे कळकळीचे आवाहन केले. पाहा प्रकटी 14:5 मध्ये योहानाने सफन्या 3:13 हे वचन कसे वापरले आहे.

626-580 वर्षे **यिर्मयाने** यहूदावर येणार असलेल्या बंदिवासाच्या संकटाचा इशारा दिला, नव्या कराराचे अभिवचन देऊन त्यांना त्यांच्या शत्रूला शरण जाण्याची विनंती केली. पाहा इब्री 8:7-13 मध्ये यिर्मयाने 31:31-34 नव्या कराराचे भाकीत कसे केले आहे.

609-597 वर्षे **हबक्कूकने** यहूदा आणि निनवे विरुद्धच्या न्यायनिवाड्याचा इशारा दिला, लोकांना विश्वास ठेवण्याचे कळकळीची आवाहन केले. पाहा गलती 3:11 मध्ये पौल हबक्कूक 2:4 हे वचन कशा प्रकारे उधृत करतो.

605-530 वर्षे **दानीएलाने** मूर्तीपूजक राष्ट्रांचे दृष्टांत आणि विश्वासणाऱ्यांचे पुनरुत्थान याविषयी तपशीलाने सांगितले. पाहा लूक 21:25-28 मध्ये येशूने आपल्या भविष्यातील परत येण्याविषयी बोलतांना दानीएल 7:13 ह्या वचनाचा कसा आधार घेतला.

587-565 वर्षे **यहेज्केलने** यहूदाचे आपल्या प्रदेशात परत येण्या विषयी सविस्तर तपशीलाने लिहिले आहे; तसेच त्यांच्या मंदिर पुन्हा बांधण्याविषयीच्या योजनांचे वर्णन केले आहे. पाहा 2 करिंथ 6:16-18 मध्ये पौल यहेज्केल 20:34,41 व 37:27 ही वचने उधृत करतो.

586-584 वर्षे **विलापगीतामध्ये** यरूशलेमेच्या होणाऱ्या विनाशाचे वर्णन आहे. पाहा मार्क 15:29-30 मध्ये विलापगीत 2:15 मधील शब्द वधस्तंभावरील येशूला कशा प्रकारे लागू आहेत.

586 वर्षे **ओबद्याने** अदोमाच्या विनाशाची घोषणा केली आणि इस्राएलाच्या विजयाचे भाकीत केले. पाहा प्रकटी 11:15 मध्ये ओबद्या 1:21 ह्या वचनाची अंतिम परिपूर्ती झाली.

520-519 वर्षे **जखऱ्याने** मसीहा ह्या भविष्यातील राजाविषयीचे अनेक तपशील अगोदरच सांगितले. पाहा मत्तय 21:4-6 मध्ये येशूने जखऱ्या 9:9 हे वचन कसे पूर्ण केले.

520 वर्षे **हाग्गयाने** यहूदाला त्यांचे मंदिर पुन्हा बांधण्याची विनंती केली, भविष्यातील आशीर्वादांचे अभिवचन दिले. पाहा इब्री 12:26-29 मध्ये हाग्गय 2:6 हे वचन कशा प्रकारे पूर्ण झाले.

430-400 वर्षे **मलाखी** हा लेख लिहिणारा शेवटचा संदेष्टा पाहा. मत्तय 11:10-11 मध्ये येशूने मलाखी 3:1 हे वचन बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला कसे लागू केले आहे.

नव्या करारातील संदेष्टे देवाने प्रत्येक मंडळीला ''प्रेषित संदेष्टे सुवार्तिक पाळक आणि शिक्षक'' दिले आहेत. इफिस 4:11 ख्रिस्ती संदेष्टे नवे शास्त्रलेख लिहीत नाहीत पण ते केव्हा केव्हा ख्रिस्ती लोकांना इतरांची मदत करता येईल अशा मार्गांचे भाकीत करतात (प्रे. कृ. 11:27-30). भाकीत करणारा संदेष्टा हा इतरांना उद्देशून अन्नती, उत्तेजन व सांत्वन ह्याबाबत बोलतो (1 करिंथ 14:3). सर्व ख्रिस्ती लोकांना एकमेकांना संदेश देता येतो (1 करिंथ 14:24).

## 2. तुमच्या सहकाऱ्याशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यांतील कार्यक्रम ठरवा.

पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्याची गोडी असणाऱ्या विश्वासणाऱ्यांना संदेष्ट्यांचे एक पुस्तक वाचण्यास सांगा. वरील भाग 1 मधील संदेष्ट्याविषयीची काही माहिती त्यांना सांगा. मग त्यांनी वाचलेल्या पुस्तकातील मुख्य मुद्दे आणि समजलेल्या महान गोष्टी इतर विश्वासणाऱ्यांना सांगाव्यात.

स्थानिक धर्मामध्ये एखादा संदेष्टा असेल तर आरंभीच्या संदेष्ट्यांनी लिहिलेली पुस्तके तुमच्याकडे असल्याचे ख्रिस्तीतर लोकांना तुम्हाला सांगता येईल. त्यांनी यात स्वारस्य दाखविले तर त्यांना पवित्र शास्त्र कोठे मिळेल ते सांगा.

## 3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेची योजना आखा

देवाने यशया संदेष्ट्याला कसे पाठविले याविषयी तुम्हाला समजलेल्या गोष्टी वाचा किंवा नाट्यीकरण करा.

पवित्र शास्त्रातील संदेष्ट्याच्या लेखांच्या अभ्यासातून देवाने कसा आशीर्वाद दिला हे विश्वासणाऱ्यांनी सांगावे.

भविष्यवाणीची पार्श्वभूमी व व्याख्या वरील भाग 1 मधून, स्पष्ट करा.

संदेष्ट्यांच्या लेखांतील मुख्य विषयांची थोडक्यात उजळणी करा.

मुलांना त्यांनी तयारी केलेल्या गोष्टी प्रौढांसमोर सादर करण्यास संधी द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी यशया 53:5 वाचा आणि प्राचीन संदेष्ट्यांनी येशूच्या रक्ताच्या यज्ञार्पणाचे भाकीत केले होते हे स्पष्ट करा.

तीन वा चारजणांचे गट तयार करून भविष्य कशा प्रकारे पूर्ण झाले याची चर्चा करा आणि एकमेकांसाठी प्रार्थना करा.

**पाठ करा** प्रे. कृ. 26:22.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net